**नियमित दिवाणी दावा क्र.८८/२०२४**

**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय.०९–०००३५५–२०२४**

**निशाणी क्र.३० वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.२ व त्यांचा मुलगा यांनी दावा मिळकती मधील हापूस आंबा कलमे अन्य त्रयस्थ इसमाकडे कराराने देऊ नये, दावा मिळकतीची विक्री इत्यादी हस्तांतरण करु नये तसेच वादी यांच्या हिश्यास असलेली मिळकत व मिळकती मधील कलम बागेसहीत विहीर यांची जोपासना करणेस अडथळा अथवा हरकत करु नये या करिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला आहे.

०२. वादी यांचे कथन व दावा मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

जिल्हा व रजिस्टर तुकडी सिंधुदुर्ग पैकी पोट तुकडी व तहसिल देवगड पैकी महसुली गाव मौजे चांदोशी येथील पुढील मिळकती

१अ मिळकत

| अ.क्र. | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. | ठिकाणाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ६०७ | ०–६९–००<br>०–१४–०० | ०–३३ | पनळ |

पैकी वादीच्या मालकीचे ०–२१–५ एवढे क्षेत्र व त्यातील २५ हापूस आंबा कलमे.

०३. वादी यांच्या कथना नुसार दावा मिळकत ही वादी यांचे पुर्वाधिकारी गणपत शंकर मोंडकर यांची स्वकष्टार्जित मिळकत होती. सदर मिळकत गणपत शंकर मोंडकर यांनी दि.०४/०४/२००३ रोजीच्या रजिस्टर मृत्यूपत्र

क्र.८५६/२००३ अन्वये वादी यास ०–४१–५ क्षेत्र, प्रतिवादी क्र.१ यास ०–२०–७ क्षेत्र व प्रतिवादी क्र.२ यास ०–२०–७ क्षेत्र उपभोगण्यास दिले होते. त्यानंतर वादी यांनी दि.०८/०२/२०१९ रोजीच्या रजिस्टर बक्षीसपत्र दस्त क्र.१९१/२०१९ अन्वये त्यांना प्राप्त मिळकती पैकी ०–२०–० क्षेत्र, प्रतिवादी क्र.३ यांना मालकी हक्काने उपभोगण्यास दिले आहे. सदर मिळकतीमध्ये शंभर हून अधिक हापूस कलमे असून त्यापैकी ५० कलमे वादी यांच्या हिश्यास नेमून दिली होती. त्यापैकी २५ कलमे वादी यांनी प्रतिवादी क्र.३ हिला दिली आहेत.

०४. प्रतिवादी क्र.२ व त्याचा मुलगा सचिन याने त्रयस्थ इसम यांच्या मार्फत वादी यांच्या वहिवाटीतील कलमा वरील आंबे परस्पर तोडून नेण्याचा प्रयत्न केला. वादी यांनी त्यास समजावून सांगितले. परंतु, प्रतिवादी क्र.२ व त्याचा मुलगा यांचे दावा मिळकतीत त्रयस्थ हित संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न दिसत आहे. असे झाल्यास वादी यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. वादी यांनी दि.०८/०५/२०२५ रोजी दावा मिळकतीची मोजणी करुन घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, प्रतिवादी क्र.२ यांच्या मुलाने प्रस्तुत मोजणीस हरकत घेतली. तसेच वादी यांना मारहाण करुन जखमी केले.

०५. प्रतिवादी क्र.२ व त्याचा मुलगा हे वादी आपल्या हिश्याच्या कलम बागेची जोपासना करत असताना त्यास हरकत अडथळा करत आहेत. प्रतिवादी क्र.२ व त्याचा मुलगा यांनी दावा मिळकतीची अन्य त्रयस्थ इसमास विक्री केल्यास वादीचे कशानेही भरुन न येणार असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत दावा प्रलंबित असे पर्यंत प्रतिवादी क्र.२ व त्यांचा मुलगा यांनी दावा मिळकती मधील हापूस आंबा कलमे अन्य त्रयस्थ इसमाकडे कराराने देऊ नये, दावा मिळकतीची विक्री इत्यादी हस्तांतरण करु नये तसेच वादी यांच्या हिश्यास असलेली मिळकत व मिळकती मधील कलम बागेसहीत विहीर यांची जोपासना करणेस अडथळा अथवा हरकत करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश पारित करावा अशी विनंती केली आहे.

०६. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र.२ यांनी हजर होऊन नि.क्र.३८ येथे आपली कैफियत व म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी वादी यांच्या अर्जातील सर्व कथनांचा स्पष्ट शब्दात नकार केला आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी यांचे पुर्वाधिकारी गणपत शंकर मोंडकर हे चांदोशी गट नं.६०७ चे मालक होते. तसेच त्यांनी सदर बागेत कलमे लावली ही बाब खरी आहे. कै.गणपत शंकर मोंडकर यांनी नोंदणीकृत मृत्यूपत्र क्र.८५६/२००३ केले होते. त्यानुसार फेरफार क्र.५५४ दि.३१/०७/२०१० रोजी मंजूर करण्यात आला. सदर नोंदीस वादी व प्रतिवादी यांनी हरकत घेतली नव्हती. गणपत शंकर मोंडकर यांनी कलम बागायत म्हणून जी लागवड केली ती स.नं.६१० मध्ये केलेली होती. परंतु त्यांनी केव्हाही स.नं.६१० अगर ६०७ ची मोजणी केलेली नव्हती.

०७. स.नं.६१० हि.नं.४ चे मालक अनिल गणपत मोंडकर यांनी त्यांच्या हिश्याचे क्षेत्र समीर यशवंत वेलणकर यांना विकले व जमिनीचा ताबा दिला. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये मागील बारा वर्षापासून समीर यशवंत वेलणकर यांची वहिवाट आहे. स.नं.६१० मधील अन्य हिस्सेदार गोपाळ सुर्यकांत रुमडे यांनी जेव्हा मोजणी करुन घेतली त्यावेळेस सदर बाब वादी यांना समजली. त्यावेळेस वादीने देखील स.नं.६०७ म्हणजेच दावा मिळकतीची मोजणी केली. परंतु, त्यामध्ये समीर यशवंत वेलणकर यांची बारा वर्षाहून अधिक काळ वहिवाट आहे. त्यामध्ये त्यांनी जोपासलेली कलम झाडे पाहून त्याची हाव वादी व प्रतिवादी क्र.३ यांना सुटल्याने त्यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

०८. वास्तवात दावा मिळकतीमध्ये वादी अगर प्रतिवादी यांची कधीही प्रत्यक्ष कब्जे वहिवाट नव्हती. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०९. वादी यांनी आपल्या दाव्याच्या पर्यायाने अर्जाच्या पुष्ट्यर्थ नि.क्र.५ येथे गाव मौजे चांदोशी येथील भूमापन क्र.६०७ चा ७/१२ उतारा, नि.क्र.६ येथे गाव मौजे चांदोशी येथील फेरफार क्र.५९४ चा उतारा, नि.क्र.७ येथे गाव मौजे चांदोशी येथील फेरफार क्र.१०८८ चा उतारा, नि.क्र.८ येथे गाव मौजे चांदोशी येथील फेरफार क्र.१४०३ चा उतारा, नि.क्र.४० अ.क्र.१ येथे गाव मौजे चांदोशी येथील गट नं.६०७ चा २००४ ते २०१४ सालचा उतारा, नि.क्र.४० अ.क्र.२ येथे गाव मौजे चांदोशी गट नं.६०७ चा ७/१२ उताऱ्याची मूळ प्रत, नि.क्र.४० अ.क्र.३ येथे गाव मौजे चांदोशी येथील फेरफार क्र.५९४ चा उतारा मूळ प्रत, नि.क्र.४० अ.क्र.४ येथे गाव मौजे चांदोशी येथील फेरफार क्र.१०८८ चा उतारा मूळ प्रत, नि.क्र.४० अ.क्र.५ येथे मो.र.नं.२२६६/२०२१ ची क प्रत, नि.क्र.४० अ.क्र.६ येथे प्रतिवादी क्र.२ याच्या मुलावर दाखल केलेली एन.सी.आर. प्रत, नि.क्र.४० अ.क्र.७ येथे प्रतिवादी क्र.२ याच्या मुलावर दाखल केलेली एफ.आय.आर. प्रत, नि.क्र.४० अ.क्र.८ येथे जबाबाची मूळ प्रत, नि.क्र.४० अ.क्र.९ येथे जिल्हा अधिक्षक भुमिअभिलेख यांच्याकडील पत्राची मूळ प्रत, नि.क्र.४० अ.क्र.१० येथे वादी यांच्या पत्नीने देवगड पोलीस स्टेशन येथे दाखल केलेल्या एन.सी.आर. ची प्रत, नि.क्र.४० अ.क्र.११ येथे वादी यांच्या वडिलांच्या मृत्यूपत्राची सहीसूद नक्कल, नि.क्र.४० अ.क्र.१२ येथे समीर वेलणकर यांना पाठवलेल्या नोटीसीची स्थळप्रत, नि.क्र.४० अ.क्र.१३ येथे वादी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र, नि.क्र.४० अ.क्र.१४ येथे भुमिअभिलेख कर्मचारी यांच्या विरुध्द दिलेल्या जबाबाची प्रत, तसेच नि.क्र.४१ अ.क्र.१ येथे दस्त क्र.१४५/२०२१ ची सहीसूद नक्कल, नि.क्र.४१ अ.क्र.२ येथे तहसिलदार देवगड यांच्या न्यायालयातील टे.के.नं.८२/२०२५ चे प्रकरण, नि.क्र.४१ अ.क्र.३ येथे ग्रामपंचायत चांदोशी यांना दिलेला अर्ज व कागदपत्रे, नि.क्र.४१ अ.क्र.४ येथे भगवान वाघ यांनी भुमिअभिलेख देवगड यांना दिलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत, नि.क्र.४१ अ.क्र.५ येथे जिल्हा अधिक्षक भुमिअभिलेख सिंधुदुर्ग यांनी वादी यांना पाठविलेल्या पत्राची मूळ प्रत, नि.क्र.४१ अ.क्र.६ येथे वादी यांना पाठविलेल्या पत्राची मूळ प्रत, नि.क्र.४१ अ.क्र.७ येथे जिल्हा अधिक्षक भुमिअभिलेख यांच्या आदेशाची झेरॉक्स प्रत,

नि.क्र.४२ अ.क्र.१ येथे उप अधिक्षक भुमिअभिलेख देवगड यांच्याकडे मागविलेला अहवालाची मूळ प्रत, नि.क्र.४२ अ.क्र.२ येथे गाव मौजे चांदोशी येथील गट नं.६१० ची गुणाकार बुक ची सहीसूद नक्कल प्रत हा कागदोपत्री पुरावा हजर केला आहे.

१०. याउलट प्रतिवादी क्र.२ यांनी नि.क्र.४७ अ.क्र.२ येथे गाव मौजे चांदोशी येथील गट नं.६०७, ६१० चा गटबुक उतारा, इत्यादी कागदोपत्री पुराव्यावर आपली भिस्त ठेवली आहे. तर नि.क्र.४८ अ.क्र.१ येथे अशोक गणपत मोंडकर यांचे प्रतिज्ञापत्र, नि.क्र.४७ अ.क्र.१ येथे अनिल गणपत मोंडकर यांचे प्रतिज्ञापत्र हजर केले आहे.

११. वादी तर्फे वकील श्री.के.ए.चव्हाण यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी आपल्या अर्जातील कथनां प्रमाणे युक्तीवाद करुन प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. याउलट, प्रतिवादी क्र.२ तर्फे वकील श्री. आर.एस.राणे यांनी आपल्या म्हणण्या प्रमाणे युक्तीवाद करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. तसेच प्रतिवादी तर्फे वकील श्री. राणे यांनी नि.क्र.४४ येथे पुढील केस लॉ हजर केले आहेत. त्याचे अवलोकन केले.

1] 2011 (6) ALL MR 15
2] 2007 (2) ALL MR 364
3] AIR 1992 Punjab and Haryana 219
4] AIR 1985 Madras 283

१२. अर्ज व त्यावरील म्हणणे पाहता व दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकता, खालील प्रश्न माझ्या निदर्शनास येतात. त्या प्रश्नांचे पुढील कारणास्तव मी माझे उत्तर देत आहे.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | वादी हे त्यांच्या हक्कामध्ये प्रथम दर्शनी केस शाबित करतात काय ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल आपल्या बाजूने असल्याचे वादी शाबीत करतात काय ? | नकारार्थी |
| ३. | तुर्तातूर्त मनाई न दिल्यास आपली अपरिमित हानी होणार असल्याचे वादी शाबीत करतात काय ? | नकारार्थी |
| ४. | मागणी नुसार तुर्तातूर्त मनाई मिळण्यास वादी पात्र आहे का ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र. १ करीता :–**

१३. वादी यांनी प्रस्तुत अर्जात दावा प्रलंबित असले काळात प्रतिवादी क्र.२ व त्यांचा मुलगा यांनी दावा मिळकतीतील हापूस आंबा कलमे अन्य त्रयस्थ इसमाकडे कराराने देवू अगर देववू नयेत, दावा मिळकतीची विक्री इत्यादी हस्तांतरण करु नये अथवा करवु नये तसेच वादी यांच्या हिश्यास असलेली मिळकत व मिळकतीतील कलम बागेसहीत विहीर यांची जोपासना करण्यास प्रतिवादी क्र.२ व त्यांचा मुलगा यांनी हरकत अडथळा करु नये अशा एकूण तीन मागण्या केल्याचे दिसून येते.

१४. वादी यांनी प्रस्तुतचा मूळ दावा हा प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या विरोधात वाटपा करिता दाखल केला आहे. वादी यांच्या कथना नुसार दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे पुर्वाधिकारी गणपत शंकर मोंडकर यांची स्वकष्टार्जित मिळकत होती. सदरच्या मिळकती पैकी वादी यास ०.४१.५ क्षेत्र,

प्रतिवादी क्र.१ यास ०.२०.७ क्षेत्र तर प्रतिवादी क्र.२ यास ०.२०.७ क्षेत्र दि.०४/०४/२००३ रोजीच्या रजिस्टर मृत्यूपत्र क्र.८५६/२००३ अन्वये दिले होते. त्या पैकी वादी यांनी ०.२०.० क्षेत्र, प्रतिवादी क्र.३ यांना बक्षीस पत्र दस्त क्र.१९१/२०१९ ने दिले आहे. त्या अन्वये वादी हा दावा मिळकती पैकी ०.२१.५ या क्षेत्राचा मालक आहे. परंतु वादी यांच्या कथना नुसार दावा मिळकतीचे अद्याप पावेतो सरस निरस वाटप झालेले नाही.

१५. प्रतिवादी क्र.२ यांनी दाखल केलेल्या कैफियत वजा म्हणणे याचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, गणपत शंकर मोंडकर हे गट नं.६०७ चे मालक होते ही बाब प्रतिवादी क्र.२ यांना कबूल आहे. तसेच गणपत मोंडकर यांनी रजिस्टर मृत्यूपत्र क्र.८५६/२००३ करुन ठेवल्याचे देखील प्रतिवादी क्र.२ यांना मान्य आहे. त्यामुळे गणपत मोंडकर हे दावा मिळकतीचे मूळ मालक होते व त्यांनी रजिस्टर मृत्यूपत्र क्र.८५६/२००३ करुन ठेवल्याची बाब सकृत दर्शनी शाबीत होते. परंतु प्रतिवादी क्र.२ यांनी आपल्या म्हणण्या मध्ये असे कथन केले आहे की, दावा मिळकत जी की, गट नं.६०७ आहे त्यावर वादी तसेच प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची वहिवाट नाही. तर सदर दावा मिळकतीवर समीर यशवंत वेलणकर यांची वहिवाट असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे वादी यांची दावा मिळकतीवर वहिवाट नसल्याने प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे. त्या करिता त्यांनी आपली भिस्त Baban Anantrao Naik vs Pramila Uttamrao Yenare (2011 (6) ALL MR 15) या न्यायनिवाडयावर ठेवली आहे. प्रस्तुत न्यायनिवाडयामध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी असे कथन केले आहे की, 'At the time of determination of an application for temporary injunction, the factum of possession would only be the relevant factor. Whether the possession is lawful possession or not would not be the subject matter of inquiry'.

१६. निश्चीतच कायद्याची एक निश्चीत भुमिका अशी आहे की, तुर्तातुर्त

मनाई अर्ज न्यायनिर्णीत करतेवेळेस दावा मिळकतीवर कब्जा कोणाचा आहे हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज न्यायनिर्णीत करतेवेळेस दावा मिळकत कोणाच्या कब्जात आहे हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी तर्फे वकील श्री. आर.एस. राणे यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी प्रस्तुत प्रकरणी नि.क्र.४७ अ.क्र.१ येथे अनिल गणपत मोंडकर यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र, तसेच नि.क्र.४८ अ.क्र.१ येथे अशोक गणपत मोंडकर यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र हजर केले आहेत. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील अर्ज हा अभिलेखावर दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रावर अवलंबून राहून न्यायनिर्णीत करणे आवश्यक आहे. जर अभिलेखावर कोणतेही प्रतिज्ञापत्र नसेल तरच इतर पुरावा विचारात घ्यावा. त्या करिता त्यांनी माझे लक्ष दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ मधील प्रथम ओळीवर वेधले. ते पुढील प्रमाणे –

**1. Cases in which temporary injunction may be granted**. – Where in any suit it is proved by affidavit or otherwise –

परंतु, Hon'ble Bombay High Court in Shamrao Ganpat Chintamani vs Kakasaheb Laxman Gorde (W.P No.324/2006) emphasized that at the temporary injunction stage affidavits are not the sole basis for deciding prima facie possession and that the material on record must be read as a whole. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ मधील प्रथम ओळीत जरी affidavit or otherwise असा उल्लेख करण्यात आलेला असला तरी त्याचा अर्थ जर प्रतिज्ञापत्र नसेल तरच इतर पुरावा विचारात घ्यावा असा होत नाही. तर प्रतिज्ञापत्रा सोबत जर अभिलेखावर इतर पुरावा उपलब्ध असेल तर तो पुरावा देखील विचारात घेणे आवश्यक आहे.

१७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी दावा मिळकती वरील आपली कब्जे वहिवाट शाबीत करण्या करिता नि.क्र.५

येथे दावा मिळकतीचा सातबारा उतारा हजर केला आहे. त्याचे अवलोकन केले असता दावा मिळकत म्हणजेच गाव मौजे चांदोशी, ता.देवगड येथील भूमपान क्र.६०७ च्या भोगवटादार सदरी वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे नाव नमुद असल्याचे दिसून येते. वादी यांनी नि.क्र.७ येथे असलेल्या फेरफार क्र.५९४ याचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांचे नाव सदर फेरफारीने तर प्रतिवादी क्र.३ यांचे नाव फेरफार क्र.१०८८ अन्वये दावा मिळकतीस नमुद झाल्याचे दिसून येते. वादी यांनी नि.क्र.५, ६, ७ येथे हजर केलेले कागदपत्र हे पब्लिक डॉक्युमेंट आहेत. याउलट, प्रतिवादी यांनी नि.क्र.४७ अ.क्र.१ व नि.क्र.४८ अ.क्र.१ येथे हजर केलेले प्रतिज्ञापत्र हा तोंडी पुरावा आहे. त्यामुळे निश्चीतच दाव्याच्या या टप्प्यावर वादी यांनी हजर केलेल्या पब्लिक डॉक्युमेंट या कागदोपत्री पुराव्याचे पुरावादृष्ट्या मूल्य (Evidentiary value) निश्चीतच जास्त आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांनी हजर केलेल्या कागदोपत्री तसेच तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता दाव्याच्या या टप्प्यावर वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची दावा मिळकतीवर कब्जे वहिवाट असल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. त्यामुळे Baban Anantrao Naik (supra) या निर्णया मधील निवाडयाचा प्रतिवादी यांना कोणताही उपयोग नाही.

१८. प्रस्तुत दावा हा वादी यांनी वाटपा करिता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी देखील दावा मिळकतीचे मूळ मालक हे गणपत शंकर मोंडकर होते ही बाब मान्य केली आहे. तसेच कै.गणपत शंकर मोंडकर यांनी नोंदणीकृत मृत्यूपत्र क्र.८५६/२००३ केले होते. त्यानुसार फेरफार क्र.५५४ दि.३१/०७/२०१० रोजी मंजूर करण्यात आला ही बाब मान्य केली आहे. तसेच वादी व प्रतिवादी क्र.२ यांचे कथन तसेच परस्परांशी नाते संबंध पाहता, दावा मिळकती मध्ये वादी यांचा अविभक्त हिस्सा असल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. त्यामुळे निश्चीतच वादी यास सकृत दर्शनी केस असल्याचे शाबीत होते. त्यामुळे मी प्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**प्रश्न क्र.२ व ३ करीता :–**

१९. वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेल्या तीन मागण्यां पैकी दोन मागण्या अशा आहेत की, दावा प्रलंबित असले काळात प्रतिवादी क्र.२ व त्यांचा मुलगा यांनी दावा मिळकतीतील हापूस आंबा कलमे त्रयस्थ इसमास कराराने देऊ नयेत तसेच वादी यांच्या हिश्यास असलेली मिळकत व मिळकती मधील कलम बागे सहीत विहीर यांची जोपासना करण्यास वादी यांना प्रतिवादी क्र.२ व त्याचा मुलगा यांनी हरकत अडथळा करु नये.

२०. वादी यांचा दावा, प्रतिवादी क्र.२ यांचे म्हणणे, तसेच वादी व प्रतिवादी यांनी हजर केलेल्या कागदोपत्री व तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, वादी व प्रतिवादी क्र.१ व २ हे सख्खे भाऊ आहेत तर प्रतिवादी क्र.३ ही वादी यांची मुलगी आहे. तर दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे पुर्वाधिकारी गणपत मोंडकर यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. म्हणजेच वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची दावा मिळकती मध्ये एकत्रितात वहिवाट असून ते दावा मिळकती मधील सहहिस्सेदार आहेत. वादी यांनी स्वत: आपल्या दाव्यामध्ये तसेच अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दावा मिळकतीचे अद्याप पावेतो सरस निरस वाटप झालेले नाही. म्हणजेच जरी मृत्यूपत्र क्र.८५६/२००३ तसेच बक्षीस पत्र दस्त क्र.१९१/२०१९ नुसार वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा हिस्सा ठरला असला तरी अद्याप पावेतो त्यांचे दावा मिळकती मधील क्षेत्र निश्चीती झालेली नाही. तसेच प्रस्तुत दावा दाखल करते वेळेस वादी यांनी ते नमुद करतात त्या प्रमाणे त्यांच्या कब्जे वहिवाटीत असलेल्या क्षेत्राच्या म्हणजेच ०.२१.५ या क्षेत्राच्या चर्तुसिमा नमुद केलेल्या नाहीत. म्हणजेच वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ हे दावा मिळकती मधील सहहिस्सेदार आहेत. प्रतिवादी क्र.२ तर्फे वकील श्री.राणे यांनी असा युक्तीवाद केला की, सहहिस्सेदार यांच्या विरोधात तुर्तातुर्त मनाई पारित करता येणार नाही. निश्चीतच कायद्याची ही निश्चीत भुमिका आहे की, सहहिस्सेदार यांच्या विरोधात तुर्तातुर्त मनाई आदेश पारित करता येणार नाही.

एकंदरीत वादी यांच्या मूळ दाव्यातील मागणी तसेच वादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये केलेल्या मागण्या यांचा सारासार विचार केला असता प्रस्तुत अर्जाच्या दृष्टीने न्यायाचा तराजू निश्चीतच वादी यांच्या बाजूने झुकला नसल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे मी प्रश्न क्र.२ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

२१. वादी यांनी अशी देखील मागणी केली आहे की, प्रतिवादी क्र.२ व त्यांचा मुलगा यांनी दावा मिळकतीतील हापूस आंबा कलमे अन्य त्रयस्थ इसमा कडे कराराने देवू नये. वादी यांच्या दाव्यातील कथनांचे स्वरुप पाहिले असता त्यांनी हे मान्य केले आहे की, प्रतिवादी क्र.२ यांचा देखील दावा मिळकती मध्ये कब्जा व वहिवाट असून प्रतिवादी क्र.२ यांची देखील आंब्याची कलमे आहेत. अशा परिस्थीतीत प्रतिवादी क्र.२ यांनी दावा मिळकतीतील हापूस आंबा कलमे अन्य त्रयस्थ इसमा कडे कराराने का देवू नयेत याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण वादी यांनी आपल्या अर्जामध्ये अगर दाव्यामध्ये केलेले नाहीत. जर प्रतिवादी क्र.२ यांनी दावा मिळकती मधील कलमे कराराने त्रयस्थ व्यक्तीकडे दिल्यास वादी यांचे कोणते नुकसान होणार आहे याचा देखील कोणताही ऊहापोह वादी यांनी आपल्या अर्जामध्ये अगर दाव्यामध्ये केलेला नाही. केवळ वादी मागणी करतात म्हणून प्रस्तुत मागणी मान्य करणे आवश्यक नाही. याउलट जर प्रतिवादी क्र.२ यांना दावा मिळकती मधील कलमे अन्य त्रयस्थ इसमांना कराराने देण्या पासून वंचित ठेवल्यास प्रतिवादी क्र.२ यांचे निश्चीतच नुकसान होण्याची शक्यता आहे. याउलट प्रस्तुत मागणी मान्य न केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी प्रश्न क्र.३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**प्रश्न क्र.४ करीता :–**

२२. वरील चर्चे अंती मी प्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी, प्रश्न क्र.२ व ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता नियम १ व २ नुसार तुर्तातुर्त मनाई अर्ज मंजूर होण्या करिता वादी यांनी त्यांना सकृत दर्शनी केस

असल्याचे शाबीत करणे आवश्यक आहे. तसेच न्यायाचा तराजू (balance of convenience) हा वादी यांच्या बाजूने झुकलेला असून तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे कशानेही भरुन न येणार असे नुकसान होणार असल्याचे शाबीत करणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणी जरी वादी यांनी त्यांना सकृत दर्शनी केस असल्याचे शाबीत केले असले तरी न्यायाचा तराजू (balance of convenience) हा वादी यांच्या बाजूने झुकलेला असून तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे कशानेही भरुन न येणार असे नुकसान होणार असल्याचे वादी हे शाबीत करु शकलेले नाहीत. तसेच प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र.२ हे दावा मिळकत विक्री द्वारे हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न करत आहेत असे सकृत दर्शनी दर्शविणारा कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता मी प्रश्न क्र.४ करिता खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**– आदेश –**

१. वादी यांचा अर्ज नि.क्र.३० नामंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निर्णयावर अवलंबून राहील.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.12.19 17:30:39 +0530

( श्रीकांत एस.पचंडी )
दिनांकः १९/१२/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड